# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १०.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०९/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४७६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४,००,६५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०९/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ६०.२ लिटर दारू एकुण १८,४६०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.०९/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०७ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १८,२१०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.०९/१२/२०२२ रोजी पोस्टे आखाडा बाळापुर येथे कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दि.०९/१२/२०२२ रोजी पोस्टे हटटा येथे कलम ३०४(अ),२७९भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोंपीताने ताब्यातील दुचाकी वाहन भरधाव वेगात हयगयी व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

दि.०९/१२/२०२२ रोजी पोस्टे औंढा ना. येथे कलम २७९,३३७,३३८, भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोंपीताने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे वाहन चालवुन धडक दिली म्हणुन फिर्यादीस जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.